

# नागानंद

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
दा. क्र. ५४७९



IRBK-0105479

५७७८

संस्कृत
साहित्य
सरिता
: १६ :

श्रीहर्ष-कृत

# नागानन्द

IRBK-0105479

कथासार
प्रा. म. रा. पिंगे
एम्. ए., एम्. एड्.

वोरा अँन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि.

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि.
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
आवृत्ति पहिली : १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
शंकर रामचंद्र दाते
'यशवंत' मुद्रणालय
२००।३ सदाशिव पेठ, पुणें २

# संस्कृत - साहित्य - सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत–साहित्य–सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे–एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनता-जनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

– प्रकाशक

# परिचय

श्रीहर्षाचें 'नागानन्द' हें नाटक अनेक दृष्टींनीं हृदयंगम आहे. स्थानेश्वरचा श्रीहर्ष हा एक श्रेष्ठ व पराक्रमी भारतीय राजा होऊन गेला. १६ व्या वर्षीं इ. स. ६०६ मध्यें गादीवर येऊन त्यानें ६४८ पर्यंत राज्य केलें व उत्तर हिंदुस्थानांत केवळ सहा वर्षांच्या कारकीर्दींत उत्कृष्ट जम बसविला ! तो मोठा सुसंस्कृत व विद्वान् असून त्याच्या आश्रयाला बाणभट्टासारखे पंडित जमले होते. त्याचीं इतर दोन नाटकें 'प्रियदर्शिका' व 'रत्नावली'.

'नागानन्दां'त बुद्ध (बोधिसत्त्व) याची स्तुति आलेली आहे; पण श्रीहर्ष हा सर्व धर्मांचा निःपक्षपाती उपासक होता. कला, साहित्य व अभ्युदय या सर्व बाबतींत त्याचें राज्य पुढारलेलें होतें.

'नागानन्द' नाटकांत नायक जीमूतवाहन हा विद्याधरांचा राजपुत्र असून राज्यप्राप्ति झाल्यानंतरहि पित्याच्या मागोमाग तो मातापित्यांची सेवा करण्याकरितां तपोवनांत जातो. तेथें उदार अंतःकरणाचा जीमूतवाहन गरुडाच्या छळापासून नागजातीला मुक्त करण्यासाठीं स्वतःचें बलिदान करतो. पुढें ईशकृपेनें त्याला पुनः जीवनलाभ होतो.

पितृभक्ति, धैर्य, करुणा, विनय, परोपकारवृत्ति व स्वार्थत्याग या श्रेष्ठ गुणांचें असामान्य दर्शन आपणांस या आनंदपर्यवसायी नाटकांत उत्तम प्रकारें घडून येतें. म्हणून ही 'नागानन्द' नाटकाची कथा लोकप्रिय झाली आहे.

—लेखक

२०६६० आलेखपाल/१२ ७१८ २५/३/५५

# नागानन्द

फार प्राचीन काळची गोष्ट. यक्ष, सिद्ध, गंधर्व, किन्नर, विद्याधर असे, मानवांहून श्रेष्ठ पण देवांच्या खालोखाल, विविध जातींचे लोक या भूतलावर संचार करीत. विशेषें-करून, त्यांचें वास्तव्य हिमालयासारख्या पर्वतांवर व त्यांच्या आसपासच्या वनप्रदेशांत असे.

विद्याधरांचा एक राजा होता. त्याचें नांव जीमूतकेतु. दीर्घ काळ राज्य करून त्यानें प्रजेचें हित साधलें. व उतार-वयांत सर्व सुखाभिलाष सोडून त्यानें ईश्वरभक्तीसाठीं वनांत जाण्याचें ठरविलें. प्राचीन भारतीय राजांची हीच परंपरा होती.

आपला मुलगा जीमूतवाहन यास राज्यावर बसवून जीमूतकेतूनें तपोवनाची वाट धरली. परलोकीं सुख व शांति यांचा लाभ व्हावा म्हणून तो अंगीं वैराग्य बाणवून भगवंताचें ध्यान करूं लागला. इकडे जीमूतवाहन राज्यकारभार चालवूं लागला.

कांहीं काळ लोटला — जीमूतवाहनानें पित्याचा मान राखण्यासाठीं गादी स्वीकारली खरी, पण त्याचें मन कांहीं केल्या राजपदीं रमेना. एक तर त्याचें पित्यावर निस्सीम प्रेम

होतें आणि त्यामुळें बापाचा वियोग त्याला दु:सह झाला; दुसरें असें कीं, जीमूतवाहन हा हाडाचाच ध्येयवादी तरुण! राज्यकारभाराच्या व्यवहारी व रुक्ष वातावरणांत त्याचा मनोवृक्ष मूळ धरीना.

या गोष्टीचा परिणाम जो व्हायचा तोच झाला! एक दिवस जीमूतवाहन उठला व सरळ पित्याकडे तपोवनांत निघून आला. राज्याचें जोखड त्यानें प्रधानमंडळाच्या मानेवर दिलें, व इकडे, वनांत तो पितृसेवा व ईशभक्ति यांतच परमसुख मानूं लागला.

वनांत जाण्यापूर्वी जीमूतवाहनाला त्याच्या प्रधानांनीं परोपरीनें सांगून पाहिलें. त्याचा ब्राह्मण - मित्र आत्रेयहि त्याला हितोपदेश करण्यास चुकला नाहीं. सचिव-मंडळ कर्तव्यदक्ष असूनहि राजा अरण्यांत गेल्यामुळें प्रजेला होणारें दु:ख, मतंग नांवाच्या बलाढ्य शत्रूचें राज्यावरील संभाव्य आक्रमण इत्यादि अनिष्ट प्रसंग मोठ्या आवेशानें आत्रेयानें जीमूतवाहनाच्या मन:चक्षूपुढें उभे केले. परंतु आपलें शरीरहि केवळ परोपकारार्थ झिजवूं इच्छिणाऱ्या जीमूतवाहनास कशाचीहि भीति किंवा लोभ वाटत नव्हता. मित्रासह तो वृद्ध राजाच्या आश्रमांत आला व तेथेंच पित्याची सेवा करीत राहिला.

एके दिवशीं वडील त्यास म्हणाले, "बाळ, या ठिकाणीं आपण बरेच दिवस राहिलों. आतां येथील समिधा, दर्भ, फळें

व फुलें संपत आलीं. तर येथून तूं मलयगिरीवर जा व तेथें आपणास वस्ती करण्यास योग्य असें एखादें ठिकाण शोधून काढ. तेथें आपण आपला नवीन आश्रम स्थापूं."

पित्याची आज्ञा होण्याचा अवकाश कीं जीमूतवाहन आपल्या प्रिय मित्रासह मलय पर्वताकडे जाण्यास निघाला. तेथील रम्य शोभा पाहून तो व आत्रेय यांचीं मनें मोहून गेलीं. तेथील सुखावह वारे, निर्मळ झरे, रंगीबेरंगी फुलें, निबिड वृक्षराजी व आनंदी पशु-पक्षी यामुळें तेथील सृष्टि सुरेखच नटली होती. जीमूतवाहनाचा उजवा डोळा लवूं लागला. दोघांनाहि आनंद झाला. कारण कांहींतरी इष्ट-लाभ होणार होता!

कांहीं अंतरावर त्यांस हरिणें स्तब्ध उभीं असलेलीं दिसलीं. त्यांना आश्चर्य वाटलें. तेथें जाऊन पोहोंचतात तोंच त्यांना संगीताचा सुरेल ध्वनि ऐकूं आला. जवळील देवळांत वीणावादन चालू होतें. दोन स्त्रिया गौरीची आराधना करण्यांत तल्लीन झाल्या होत्या.

त्यांपैकीं एक होती मलयवती. ती सिद्धांचा राजा विश्वावसु याची कन्या. दुसरी तिची दासी चतुरिका. वीणा-वादन झाल्यानंतर दोघींचा संवाद सुरू झाला व तो वृक्षाआड लपलेल्या या दोन पुरुषांनीं ऐकला.

दासी :– "ताईसाहेब, कशाला ती गौरीची आराधना? अजून कसलाहि प्रसाद नाहीं!"

मलयवती :–" चतुरिके, देवीची अशी निंदा करूं नकोस!" आजच गौरीनें मला स्वप्नांत दर्शन देऊन सांगितलें कीं, मलयवती, तुझ्या भक्तीनें मी संतुष्ट झाल्यें आहें. लवकरच विद्याधरांचा चक्रवर्ती तुझें पाणिग्रहण करील."

हा संवाद ऐकतांच जीमूतवाहन व आत्रेय देवालयांत आले. जीमूतवाहनास पाहतांच मलयवतीच्या मनांत संकोच व लज्जा उत्पन्न झाल्यामुळें त्या दोघांमध्यें बोलणें होऊंच शकलें नाहीं; व पाहुण्यांचें स्वागत दासीनेंच – चतुरिकेनेंच केलें.

मध्यंतरीं दुपार झाल्यामुळें मलयवतीला आपल्या आश्रमांत आणण्यासाठीं कुलपति कौशिकमुनींनीं आपला शिष्य शांडिल्य यास देवळांत पाठविलें. सिद्धांचा राजपुत्र मित्रावसु आपल्या पित्याच्या – विश्वावसूच्या आज्ञेनुसार मलय पर्वतावरच कुठें तरी असलेल्या जीमूतवाहनास आपल्या भगिनीचा – मलयवतीचा पति म्हणून निश्चित करण्यासाठीं त्याच्या भेटीच्या इराद्यानें भटकत होता. भावाची वाट पाहात असलेल्या मलयवतीला क्लेश होऊं नयेत म्हणून कौशिकमुनींकडून तिला बोलावणें आलें होतें.

मुनिशिष्य शांडिल्य यास सर्वांनीं अभिवादन केलें. त्या ठिकाणीं सर्वांची ओळख झाली. जीमूतवाहन त्या ठिकाणीं अतिथि असल्यामुळें त्याचें आदरातिथ्य झालें. थोडया वेळानें सर्वजण आपापल्या ठिकाणीं निघून गेले.

: २ :

मलयवती कौशिकमुनींच्या आश्रमांत आली खरी, पण तिचें मन कांहीं तिच्याबरोबर आलें नाहीं; तें जीमूतवाहनानें केव्हांच चोरून नेलें होतें. ती बेचैन झाली. राहून राहून तिला याबद्दल खेद वाटूं लागला कीं, जीमूतवाहनाचें दोन शब्दांनींहि मी स्वागत करूं शकल्यें नाहीं. परंतु गोष्ट होऊन गेली! आतां पुनः त्याचें दर्शन केव्हां नि कसें होणार? तिच्या डोळ्यांमधून दुःखाश्रु ठिबकूं लागले.

तिची दासी चतुरिका हिनें तिची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. ती म्हणाली, “ राजकन्ये, धैर्य धर ! देवीच्या वराप्रमाणें सर्व कांहीं मंगल होईल. तुझ्याप्रमाणेंच त्या मलयकेतूचीहि दशा झाली असली पाहिजे. ”

आणि खरेंच ! जीमूतवाहनाची विरहव्याकुळ अवस्था त्याला सहन होईना. तो आत्रेयाला आपलें दुःख सांगूं लागला. मनाला विरंगुळा म्हणून तो मित्रासह लतागृहांत आला व तेथें शिलातलावर रंगीत दगडानें आपल्या प्राणवल्लभेचें चित्र काढूं लागला. तिच्याबद्दल दोघांमध्यें संवाद चालू झाला.

एवढ्यांत त्याच ठिकाणीं आलेली मलयवती तें चित्र-रेखाटन पाहून व तो संवाद ऐकून संशयानें ग्रस्त झाली. तिला वाटलें कीं, जीमूतवाहनाचें दुसऱ्या कोणा स्त्रीवर प्रेम आहे, व आपण उगीचच मृगजळाप्रमाणें त्याच्या

मागें भटकत आहोंत. पण चतुरिकेनें तिला त्या वेळींहि धीर दिला. ती आडोशाला राहून पाहूं लागली. इतक्यांत मलयवतीचा भाऊ मित्रावसु पित्याच्या आदेशानुसार जीमूतवाहनास शोधीत तेथें आला व त्यानें मलयवतीचें करग्रहण करण्याची त्यास विनंति केली. परंतु जीमूतवाहनानें त्यास आपल्या पित्याकडे (जीमूतकेतूकडे) जाण्यास सांगितलें. मलयवतीला वाटलें कीं, भावाच्या सूचनेचा जीमूतवाहनानें अव्हेर केला व ती अत्यंत शोकाकुल झाली. तेथील वेलीनें आपल्या गळ्याला फास घालून घेऊन आत्महत्या करण्याचा तिनें विचार केला. मित्रावसु दूर गेला कीं नाहीं हें पाहाण्यासाठीं तिनें चतुरिकेला पाठवून दिलें व ती आत्महत्येच्या तयारीला लागली. पण चतुरिकेला कल्पना आली होती कीं, आपण येथून दूर जाऊं नये; मलयवती दु:खाच्या भरांत आपल्या जीवाचें बरेंवाईट करून घेईल तेव्हां ती तेथून निघून गुपचूप झाडाआड लपून राहिली.

चतुरिकेच्या कल्पनेप्रमाणें मलयवतीनें आपल्या गळ्याला फांस घालतांच चतुरिका एकदम पुढें धावली व "धांवा, धांवा, राजकन्येला वांचवा!" असें मोठ्यानें ओरडली.

जीमूतवाहन व त्याचा मित्र आत्रेय आसपासच होते. ते त्या ठिकाणीं लगेच धावून आले व त्यांनीं तिची सुटका केली. त्यांनीं शिलातलावरील तिचीच आकृति मलयवतीला

दाखवून तिच्या मनांतील विकल्प काढून टाकला. पुनरपि ती आनंदित झाली.

एवढ्यांतच जीमूतकेतूनें मलयवतीचा सून म्हणून स्वीकार करण्याचें कबूल केल्याची बातमी मलयवतीच्या दासीनें आणली. नायक-नायिकांचे मनोरथ पूर्ण झाले! आनंदीआनंद झाला!!

## : ३ :

जीमूतवाहन व मलयवती यांच्या विवाहानें विद्याधर व सिद्ध या जातींचा घनिष्ठ संबंध जुळून आला. कित्येक दिवस तो महोत्सव चालू होता. एकमेकांच्या सहवासांत पति-पत्नींचे दिवस सुखांत व आनंदांत चालले होते.

एके दिवशीं जीमूतवाहनाकडे त्याचा मेहुणा मित्रावसु कांहीं कामानिमित्त आला. त्याची अस्वस्थ मनःस्थिति ओळखून जीमूतवाहनानें त्याला तिचें कारण विचारलें. "मतंगानें तुझें राज्य जिंकून घेतलें," अशी दुःखद हकीगत मित्रावसूनें जीमूतवाहनास सांगितली व त्यास आश्वासनहि दिलें कीं, "सिद्धांची वीरसेना तुझ्या शत्रूचा पराभव करून तुझें राज्य तुला परत मिळवून देईल! तूं यत्किंचित् देखील काळजी करूं नकोस." हे मित्रावसूचे शब्द ऐकून जीमूतवाहनास धक्काच बसला! त्यानें म्हटलें, "मित्रावसु, माझ्याकडे याचना केली नसतांहि मी माझे प्राण दुसऱ्या-

साठीं अर्पण करीन! असें असतांना असंख्य प्राण्यांचा नाश करणाऱ्या युद्धाला मी कशी संमति देऊं? माझा जुना वैरी मतंग याच्या राज्यलोभाच्या पापामुळें मला त्याची कींव येते! त्याला हुसकून लावण्यासाठीं लढाईचा मार्ग तुम्ही अवलंबूं नका असें माझें तुम्हांस सांगणें आहे."

पण एवढ्यानें मित्रावसूची समजूत होणें शक्य नव्हतें. त्याजबरोबर सविस्तर चर्चा करण्यासाठीं जीमूतवाहनानें त्यास आपल्या अंतर्गृहांत नेलें.

:४:

एके दिवशीं जीमूतवाहन विश्वावसूला घेऊन समुद्र-तीरावर सृष्टिसौंदर्य बघण्यास गेला. तेथून पर्वताच्या शिखरा-जवळील मार्गानें जात असतांना मलय पर्वताचीं शुभ्र शिखरें नजरेला आलीं व त्याकडे तो कुतूहलानें पाहात राहिला. पण मित्रावसूनें त्याला सांगितलें कीं, "हीं गिरिशिखरें नसून असंख्य सापांच्या हाडांचे पर्वतप्राय ढीग आहेत!"

जीमूतवाहनाचें हृदय अत्यंत कोमल होतें. अगणित सापांचें मरण आणि तेंहि एकाच गिरिप्रदेशांत! हें कोडें त्याला सुटेना. तेव्हां मित्रावसु त्याला सांगूं लागला, "पूर्वीं गरुड समुद्रांतून आपल्या पंखांनीं पाणी उपसून पाताळां-तील सर्प चोंचीनें उचलून खाऊन टाकी व अशा रीतीनें अगणित साप दररोज नष्ट होत. तेव्हां सर्पराज वासुकीनें

त्यास विनंति केली, ' पक्षिराज, तुमच्या हल्ल्यानें हजारों सर्पांचा रोज नाश होतो. त्यांच्या स्त्रियांचे गर्भ गळून पडतात व त्यांचीं अर्भकें अकालींच यमलोकीं जातात. अशा रीतीनें आमची संख्या रोज घटत जाते व तुम्हांसहि पुढें आम्हांकडून अन्नाचा पुरवठा होणार नाहीं. तर आमची एवढी विनंति मान्य करा. आम्ही दररोज एक नाग या समुद्रतीरीं तुम्ही बसलेले असतांना तुमच्याकडे पाठवीत जाऊं, त्याचा तुम्ही स्वीकार करून आमची सरसहा कत्तल थांबवा.' गरुडानें ती विनंति मान्य केली. तेव्हांपासून तो दररोज या ठिकाणीं साप खाऊन त्यांचीं हाडें टाकीत असतो. फार काळ हा क्रम बिनबोभाट चालू आहे. कालांतरानें शुभ्र हाडांच्या सांपळ्यांचे व तुकड्यांचे हे डोंगरासारखे ढीग उंचावले आहेत!

मित्रावसूनें सांगितलेली ही 'शुभ्रशिखरां'ची जन्मकथा ऐकून जीमूतवाहन थक्क झाला. काय ही पोटभरू प्राण्यांची अधोगति! टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठीं मूर्ख लोक केवढीं पापें करतात या जगांत! अरेरे! अखिल नागजातीवर केवढा हा दुर्धर प्रसंग! आणि यावच्चंद्र दिवाकरौ या क्रूरतेला कधीं खंड पडणारच नाहीं का? काय बरें करावें? या सापांच्या प्राणांचें रक्षण करावयास मी समर्थ होईन का? असे सहानुभूति व कारुण्य यांनीं भरलेले विचार त्याच्या मनांत एकसारखे येऊं लागले.

इतक्यांत मलयगिरीच्या शिखरावर एक व्यक्ति चढली व तेथून ती कांहींतरी शोधण्यासाठीं चोहों दिशांकडे निरखून पाहूं लागली. तिच्या नजरेला मित्रावसु पडल्याबरोबर ती त्याजकडे आली व तिनें त्या दोघांना अभिवादन केलें. तो सुनंद नांवाचा विश्वावसूनें मुलाकडे पाठवलेला नोकर होता. त्यानें मित्रावसूच्या कानांत कांहीं गोष्ट सांगितली. त्याबरोबर 'वडील आपणांस बोलावीत आहेत' असें सांगून व 'आपण अशा या धोक्याच्या जागीं फार काळ राहूं नका' अशी जीमूतवाहनास प्रेमाची सूचना देऊन मित्रावसूनें मेहुण्याचा निरोप घेतला.

नंतर जीमूतवाहन समुद्राच्या किनाऱ्यावर आला व तेथें विचारांच्या तंद्रींत इतस्ततः फिरूं लागला. एकाएकीं आर्त स्वरांत काढलेले पुढील शब्द त्याच्या कानीं पडले:'हाय हाय! बाळा, शंखचूडा, आज तूं मारला जात असतांना तुला बघण्याचें माझ्या नशिबीं आलें रे' जीमूतवाहन दचकून पाहूं लागला. आसपास तर कोणी दिसेना! ते स्त्रीचे शब्द आहेत एवढेंच त्यानें ओळखलें.

आवाजाच्या रोखानें थोडा वेळ वाटचाल केल्यानंतर त्याला एक विलक्षण दृश्य दिसून आलें. शंखचूड नांवाचा एक तरुण साप पुढें चालला होता. त्याच्या मागून त्याची म्हातारी आई अश्रु ढाळीत चालली होती. त्यांच्याबरोबर एक राजाचा शिपाई होता. त्यानें आपल्याबरोबर दोन लाल

वस्त्रें लपवून घेतलीं होतीं. शंखचूडाच्या आईचा विलाप चाललाच होता– "बाळा, तुझ्या पश्चात् पाताळांत मला आणखी अंधार वाटेल ! तुझें किती कोमल शरीर ! आणि तें तो क्रूर गरुड पडवळाप्रमाणें खाऊन टाकणार! हाय ! मला ती कल्पनाहि सहन होत नाहीं." मुलगा आईचें सांत्वन करीत होता– "आई, तूं शोक कां करत्येस ? प्राणी जन्मला कीं पहिल्यानें त्यावर अनित्यतेची - मृत्यूची - छाया पडते आणि नंतर आईच्या प्रेमस्पर्शाची ! तर जीवित हें इतकें क्षणभंगुर असतांना तूं या हाडा-मासाच्या गोळ्याबद्दल कां कष्टी होतेंस ? जगरहाटी पाहून तूं धैर्य धर. जातों मी आतां."

तरी देखील आई पुत्राच्या पाठींच होती. "थांब रे बाळा, मला तुझें शेवटचें मुखदर्शन दे., थोडा वेळ तरी थांब !" तिकडे तो शिपाई त्याला घाई करीतच होता, "शंखचूडा, तुझ्या आईचें बोलणें थांबणार नाहीं. तिला राजाची आज्ञा काय कळते ? प्रेमानें आंधळी झाली आहे ती ! वेळ भरत आली. हो पुढें" शंखचूड बिचारा तयार झाला. तेवढ्यांतच जीमूतवाहन त्या ठिकाणीं येऊन दाखल झाला.

राजाच्या नोकरानें शंखचूडाची क्षमा मागून त्यास म्हटलें, "शंखचूडा, माझा नाईलाज आहे. कर्तव्य म्हणून मला ही राजाज्ञा तुला सांगावी लागते. मी हीं दोन लाल

वस्त्रें तुला देतों. हीं अंगावर चढव व या शिळेवर बैस. पक्षिराज गरुड आतां येईल व संकेताप्रमाणें तुझ्या वस्त्रांवरून तुला भक्ष्य समजून खाईल व निघून जाईल. माफ कर. जातों मी. कारण आतां गरुड येईलच !" असें बोलून तो त्वरेनें निघून गेला.

ही सर्व दु:खद घटना पाहून व शंखचूडाच्या आईचा विलाप ऐकून कनवाळू जीमूतवाहनाचें अंत:करण कळवळलें. त्याला वाटलें कीं गरुडाचें हृदय वज्राचेंच बनलेलें असावें ! आणि म्हणूनच तो रोज असे प्रसंग या ठिकाणीं निर्माण करतो. शंखचूडाची आई त्याच्या गळ्याला बिलगली व म्हणाली, " बाळा, माझ्या हजारों आशा केवळ तुझ्यावर अवलंबून होत्या. किती नवसासायासांनीं तूं लाभला होतास. किती विनयशील तूं ! पूर्णिमेच्या चंद्राप्रमाणें असणारें तुझें हें मुख आतां मला केव्हां दिसणार का !"

दु:खातिशयामुळें आईची छाती फुटेल अशी भीति वाटूं लागली शंखचूडाला. आईला त्यानें सांगितलें कीं, " आतां जगांत दुसऱ्याच्या दु:खाकडे सहानुभूतीनें पाहाणारे लोक कोठें आहेत ? नि:स्वार्थी लोक नाहींतच. तेव्हां कोणापुढें तूं अश्रु ढाळणार ? धीर धरून उरलेलें आयुष्य कंठीत राहा." माता म्हणाली, "बाळ, धीर कसा धरूं ? माझा तूं एकुलता एक मुलगा. पण तुला कोण वांचवणार ? वासुकी राजानें तुला या बलिदानाची सूट

कां दिली नाहीं ? हाय ! हाय ! त्या कृतांताला देखील इतर सर्व प्राण्यांचा विसर पडून तुझीच कशीं आठवण झाली ? माझ्यासारखी दुर्दैवी मीच !" असें बोलून ती मूर्छित झाली.

शंखचूड तिला सावध करण्याचे यत्न करूं लागला. जीमूतवाहनाला आतां राहावेना. त्याला वाटलें कीं "या अभागी व स्वजनांनीं टाकलेल्या शंखचूडाला जर मी स्वत:चा बळी देऊन वांचवलें नाहीं तर या माझ्या शरिराचा तरी काय उपयोग ?"

असा विचार करून तो पुढें सरला व त्यानें प्रतिज्ञा केली, "मी शंखचूडाला वांचवीन ! बाई, तुम्ही कांहीं काळजी करूं नका."

पण शब्दांचा अर्थ कळण्याच्या मन:स्थितींत ती नव्हतीच. तिला वाटलें कीं पक्षिराज गरुडच पुढें आला आहे. व त्याला उद्देशून ती भ्रमांतच आपल्या पदरानें पुत्राला आच्छादून बोलली, "पक्षिराज मलाच खा. राजा वासुकीनें मलाच तुमच्या भोजनासाठीं नियुक्त केलें आहे."

.जीमूतवाहन तें मातृप्रेम पाहून थक्क झाला. गरुड कितीहि निर्घृण असला तरी हें वात्सल्य पाहून त्याचें हृदय खात्रीनें द्रवेल अशी त्याला खात्री वाटली.

शंखचूडानें आईला आश्वासनपूर्वक सांगितलें कीं, "हा गरुड नव्हे. हा कोणी सत्पुरुष आहे. कुठें गरुडाची

क्रूरता आणि कुठें या महात्म्याची सौम्यता !" वृद्धेनें म्हटलें, "तुझ्या समीप आलेल्या मृत्युकालामुळें मला सर्व कांहीं गरुडमयच दिसत आहे !" जीमूतवाहनानें तिचें सांत्वन केलें. "बाई, तुम्ही बिलकूल घाबरूं नका. मी एक विद्याधर आहें व तुमच्या बाळाचें रक्षण करण्यासाठीं मी येथें आलों आहे."

हे शब्द ऐकून त्या म्हातारीला केवढा आनंद झाला ! मोठ्या आनंदानें ती उद्गारली, "बाळा, पुन: पुनः हेच शब्द म्हण पाहूं. केवढा आधार वाटूं लागला मला आतां. बाळा, तूं चिरंजीव हो !"

मग जीमूतवाहनानें तिला विनंति केली, "बाई हीं सांकेतिक लाल वस्त्रें मला द्या म्हणजे मी तीं माझ्या अंगावर चढवतों व तुमच्या पुत्राला वांचविण्याकरितां मी माझें शरीर पक्षिराजाला अर्पण करतों."

त्या वृद्धेनें आपल्या कानावर हात ठेवले व म्हटलें, "अमंगल टळो. असें तूं काय बोलतोस ? तूंहि मला शंखचूडासारखाच आहेस. किंबहुना त्याच्यापेक्षांहि तूं मला श्रेष्ठ वाटतोस. कारण जगानें टाकलेल्या माझ्या मुलाला तूं स्वत:चें बलिदान करून वांचवूं इच्छितो आहेस, ही केवढी मोठी गोष्ट आहे !"

शंखचूडाला जीमूतवाहनाचें हें असामान्य व अपूर्व कर्म पाहून मोठा विषाद वाटला. कारण आपले स्वत:चे प्राण

जगविण्यासाठीं विश्वामित्रानें कुत्र्याचें मांस देखील खाल्लें व गौतमानें आपला मित्र राजधर्मा नांवाचा बगळा यासहि केवळ क्षुधा शमविण्यासाठीं ठार केलें. पण हा जीमूतवाहन तर दुसऱ्याचे प्राण वांचावेत म्हणून निरपेक्ष बुद्धीनें आपले स्वतःचे प्राण अर्पण करतो आहे. हें प्रत्यक्ष पाहून त्याला फारच अचंबा वाटला व जगांतील सर्व-सामान्य स्वार्थी लोकांबद्दल फारच विषाद उत्पन्न झाला. त्यानें जीमूतवाहनास म्हटलें, " हे महापुरुषा, माझ्या-विषयींचें तुझें निरपेक्ष प्रेम स्पष्ट झालें आहे. तर आतां हा आग्रह धरूं नकोस. माझ्यासाठीं तुझा बळी देऊं नकोस. माझ्यावर कृपा कर."

जीमूतवाहनानें त्याचा हात धरला व म्हटलें, " मुला, तूं माझ्याआड आतां येऊं नकोस. बऱ्याच काळानंतर ही मला दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची संधि मिळाली आहे. तर तीं वध्यवस्त्रें मला देऊन टाक ना आतां ! "

पण शंखचूड त्या गोष्टीस कबूल होईना. त्या महा त्म्याचें आपल्या जागीं बळि दान होणें हा आपल्या कुळाला कायमचा कलंक अशीच त्याची भावना होती. तेव्हां त्यानें जीमूतवाहनाला विनंती केली कीं, जर तूं माझ्यावर दया करणार असशील, तर एवढेंच कर कीं माझ्या पश्चात् माझ्या आईचा सांभाळ कर व तिला आत्महत्त्या करूं देऊं नकोस.

जीमूतवाहनानें म्हटलें, " अरे, तिला वांचविण्याचाच उपाय मी तुला सांगितला. तूं जिवंत तर ती जिवंत. तूं गेलास तर तिचाहि प्राणत्याग ठरलेला. तर केवळ हाच उपाय आहे– तीं वस्त्रें इकडे आण." ती पांघरून मी त्या शिलातलावर बसतों. तूं आईला पुढें करून या ठिकाणांतून लवकर पाय काढ. केवढें भयंकर आहे हें महाश्मशान ! ती खुनी शिळा व तिच्याजवळील हाडांच्या प्रचंड राशी पाहून भीतीनें तिचे प्राणहि जातील ! जा येथून लवकर कसा, गरुडाची येण्याची वेळ झालीच. जा, जा लवकर."

तरी पण कोणीच तेथून हालेना. शंखचूडानें निश्चयच केला होता–राजाज्ञा पाळण्याचा व त्या सत्पुरुषाला आपल्या स्थानीं मरूं न देण्याचा. त्यानें आईला शेवटचा प्रणाम केला व आशीर्वाद मागितला कीं, "तूंच प्रेमळ आई मला जन्मोजन्मीं लाभावीस." त्याच्या आईचें हृदय भडभडून आलें. ते त्याचे शेवटचे शब्द 'शेवटचे' आहेत ही वस्तुस्थिति तिला असह्य झाली होती. तिनें मुला-बरोबरच मरण्याचा ठाम निश्चय केला. शेवटचें शिवदर्शन घेण्यासाठीं मायलेक कांहीं अंतरावरील देवालयांत गेले.

जीमूतवाहनाची फारच निराशा झाली. त्याला चालून आलेली आत्मयज्ञाची संधि हातची गेलीच असें वाटूं लागलें. यांतून मार्ग कसा काढावा या विचारांत तो गर्क झाला.

तेवढ्यांतच दिवाळीची भेट म्हणून जीमूतवाहनाला मलयवतीच्या आईकडून लाल वस्त्रांची एक मूल्यवान् जोडी घेऊन एक सेवक तेथें येऊन पोहोंचला. ती पहिल्या दिवाळीची सासुरवाडची जांवयाला आलेली देणगी. जीमूतवाहनाला खरोखरीच ती लाख किंमतीची वाटली ! आपल्या जीविताचें ध्येय गांठण्यासाठीं मोठी शक्ति त्याला प्राप्त झाली. मलयवतीशीं लग्न केल्याचें खरें फळ आतां प्राप्त झालें असें त्यास वाटूं लागलें. त्यानें नोकराबरोबर आपले सादर प्रणाम मलयवतीच्या मातु:श्रीकडे पाठविले. नोकर निघून गेला.

आतां तीं लाल वस्त्रें जीमूतवाहनानें अंगावर चढवलीं तो गरुड येण्याची वाट पाहूं लागला.

जोराचा वारा सुरू झाला. पर्वतावरील शिळा हालूं लागल्या. झंझावातामुळें सागरांतील पाणी जणूं पृथ्वी बुडविण्यासाठीं किनारा व्यापून वर येऊं लागलें. आकाश मेघांप्रमाणें भरून निघालें. तो पक्षिराजच विशाल पंख फडफडावीत वेगानें येत होता.

जीमूतवाहनाला फार बरें वाटलें. शंखचूड देवालयांतून परत येण्यापूर्वींच आपलें कार्य सिद्धीला जाईल अशी आशा त्याला वाटूं लागली. वध्यशिळेवर तो चढला. मलयवतीच्या स्पर्शाप्रमाणेंच तो शिळेचा स्पर्श त्याला सुखावह झाला. लहानपणांत मातेच्या मांडीवर पहुडल्यानें जें सुख वाटतें तेंच

सुख त्या ध्येयवादी विद्याधराला त्या शिळेवर कलंडल्यानें झालें. रक्तवस्त्रांनीं त्यानें स्वतःला आच्छादून घेतलें व तो तयार राहिला.

पक्षिराज उपस्थित झाला. रक्तवस्त्रांवरून त्यानें आपलें भक्ष्य ओळखलें. झेंप घालून जीमूतवाहनाला धरल्याबरोबर स्वर्गांतून पुष्पवृष्टि झाली व दुदुंभि वाजूं लागल्या. 'असें कां ?' हें गरुडाला मात्र कळलें नाहीं. त्यानें अशी कल्पना केली कीं 'आपल्या उड्डाणाच्या वाऱ्यामुळें पारिजात हादरला व त्याचीं फुलें पडलीं. आपल्या प्रचंड भराऱ्यांमुळें भूप्रलय होणारच या खात्रीनें प्रलयकालीन मेघ आकाशांत गडगडाट करीत आंहेत.' या कल्पनांनींच स्वतःची समजूत करीत त्यानें जीमूतवाहनाला उचललें व तो मलयपर्वतावर यथेच्छ आहार करण्यासाठीं उडून गेला. त्या दिवसाचें त्याचें भक्ष्य वजनदार वाटल्यामुळें, आपली क्षुधाशांति उत्तम प्रकारें होईल अशी त्याला खात्री वाटली.

## : ५ :

इकडे जीमूतवाहनाच्या श्वशुराला – विश्वावसूला – काळजी वाटूं लागली होती. ज्या ठिकाणीं जीमूनवाहन फिरावयास गेला होता ती जागा गरुडाच्या संचारामुळें धोक्याची आहे हें त्याला ठाऊक होतें. तो घरीं आला कीं नाहीं हें पाहाण्यासाठीं त्यानें जीमूतकेतूच्या आश्रमांत

आपल्या सुनंद नांवाच्या सेवकास पाठविलें. आश्रमांत आल्याबरोबर त्याला वृद्ध जीमूतकेतु व त्याची सेवा करीत असलेली पत्नी व सून समोरच दिसली. महाराज विश्वावसूकडून आपण जीमूतवाहनाची वार्ता विचारण्यासाठीं आलों आहोंत असें सुनंदानें सांगितल्यावरून त्या वृद्ध बापाला, आईला व पत्नीला भयंकर काळजी वाटूं लागली. त्यांना वाटलें होतें कीं, जीमूतवाहन विश्वावसूकडेच गेला असेल किंवा फलमूलादि गोळा करण्यासाठीं कोठें तरी दूर डोंगरावर फिरत असेल. पण प्रत्यक्ष घडत असलेल्या दुःखद प्रसंगाची छाया त्या सर्वांवरच पडली होती. त्यांना दुश्चिन्हें दिसूं लागलीं !

महाराज जीमूतकेतूचा डावा डोळा लवूं लागला. 'भगवान् सूर्यनारायण मुलाचें रक्षण करो' अशी प्रार्थना करीत तो जों वर सूर्यबिंबाकडे पाहातो तोंच रक्त-मांसांनीं लडबडलेलें एक तेजस्वी शिरोरत्न आकाशांतून सूर्यप्रकाशांत तरळत खालीं पडत असलेलें त्याला दिसलें. वृद्ध राणीनें म्हटलें कीं, बाळ जीमूतवाहनाच्या चूडामणीसारखें हें रत्न दिसत आहे. मलयवतीचें मनहि अत्यंत व्याकुळ झालें. सुनंदानें त्यांचें शांतवन केलें. 'या मलयगिरीवर गरुडानें छिन्नभिन्न केलेल्या मोठमोठ्या नागांचे पुष्कळ शिरोमणी अशा प्रकारें पडत असतात. त्यांत भिण्यासारखें कांहीं नाहीं' असें सुनंदानें त्यांस म्हटलें व जीमूतकेतूलाहि वाटलें कीं तसेंच कांहींतरी असेल. राणीनें सुनंदाला

सांगितलें कीं, 'तूं आतां जा. जीमूतवाहन सासऱ्याच्या घरीं गेला असेल. आम्हांला ताबडतोब काय तें येऊन कळव मात्र.' सुनंद निघून गेला.

तितक्यांतच त्या ठिकाणीं रक्तवस्त्राच्छादित शंखचूड येऊन ठाकला. अश्रु ढाळीत तो शोक करूं लागला– 'हाय रे दैवा! अखेर तूं माझी फसवणूक केलीस! मी शिवदर्शन करून येतों तोंच कोणतें दृश्य मला दिसलें? वध्यभूमीवरून गरुडानें त्या विद्याधराला उचलून आपल्या नखांनीं व चोंचीनें त्याला विदारीत आकाशांत दूर उड्डाण केलें. हे विशालहृदया विद्याधरा! केवढें हें तुझें निरपेक्ष प्रेम! केवढी गाढ भूतदया! किती अकृत्रिम कारुण्य! कशी लोकोत्तर परोपकार बुद्धि! महात्म्या विद्याधरा, कोठें तूं निघून गेलास? दे ना मला प्रत्युत्तर! काय? नाहीं बोलत? हाय! हाय! दुर्दैवी शंखचूडा, काय केलेस तूं हें! आत्मयज्ञ करून सर्पजातीचें रक्षण केल्याबद्दलच्या कीर्तीला तूं मुकलास. राजाची शिरोधार्य आज्ञा तूं उल्लंघलीस. तुझ्यासाठीं तूं दुसऱ्याचा बळी दिलास! तूं पूर्णतया स्वतःची फसवणूक करून घेतलीस. आतां माझ्या जीवनाचा प्रत्येक क्षण म्हणजे उपहासाचें कारण!'

असा विलाप करीत तो त्या विद्याधराच्या रक्ताच्या रोखानें त्या आश्रमांत आला होता. वृद्ध राणीची नजर पहिल्यानें त्याच्याकडे वळली व ती अगदीं अस्वस्थ झाली.

तिनें राजाला त्या दुर्दैवी शंखचूडाकडे चौकशी करावयास सांगितलें. शंखचूडाचा विलाप चालूच होता. " हे माझ्या रत्ना ! तूं मला पुनः कुठें दिसणार ! हाय हाय ! चोरी झाली माझी !"

परंतु या शब्दांनीं त्या आश्रमांतील चिंतातुर व्यक्तींना समाधान लाभलें. त्यांची अशी (गैर) समजूत झाली कीं,- 'हा कोणीतरी सर्प आपलें चूडारत्न पक्ष्यानें उचकून पळवल्यामुळें शोक करीत आहे, तेव्हां तें आकाशांतून पडणारें रत्न याचेंच असलें पाहिजे.' तिघांनाहि आनंद झाला. सासूनें सूनेचें अभिनन्दन केलें. जीमूतवाहनाच्या केसालाहि धक्का लागलेला नाहीं अशा दृढ समजुतीनें कांहीं काळ त्या तिघांना स्वास्थ्य व शांति यांचा लाभ झाला.

पण कांहीं झालें तरी ती समजूत भ्रामक होती ! शंखचूडाजवळ जाऊन वृद्ध राजानें त्याला प्रश्न केला– " बेटा, तुझा चूडामणि हरवला का ?"

शंखचूड :– " अहो, केवळ माझाच नव्हे ! तर सर्व त्रिभुवनाचा."

जीमूतकेतु :– " तें कसें काय ?"

शंखचूड :– " माझें हृदय दुःखानें भरून आलें आहे ! तें सर्व इतिवृत्त मी कसें सांगूं शकणार ?"

जीमूतकेतू :–"बाळा, तुझें दुःख तूं मला सांगच. त्यांत मी सहभागी होईन व अशा रीतीनें तें तुझें दुःखाचें ओझें बरेंच कमी होऊन तुला तें सुसह्य वाटेल."

शंखचूड :–"तर मग ऐका, महाराज ! मी शंखचूड नांवाचा एक नाग आहे. वासुकी आमचा राजा. त्याच्या आज्ञेप्रमाणें मी वैतनेयाच्या आहारासाठीं या सागरतीरावरील शिळेकडे आलों. पण एका उदार अंत:करणाच्या विद्याधरानें दयायुक्त होऊन मी 'नको नको' म्हणत असतां माझ्यासाठीं आपला देह गरुडाला अर्पण केला."

जीमूतकेतू :–" असा हा परहितार्थ सर्वस्वाचा होम करणारा दुसरा कोण असणार ? माझा पुत्र जीमूतवाहनच तो. हाय ! हाय ! घात झाला !"

सर्वांना निश्चित वृत्त कळलें. जीमूतवाहनाच्या मातापितरांच्या व पत्नीच्या शोकाला पारावार नव्हता. शंखचूडाला कळून चुकलें कीं तीं त्या महात्म्याचीं मातापितरें. तो म्हणाला, 'माझ्या तोंडून ती अप्रिय बातमी बाहेर पडली ! आणि यांची ही अवस्था झाली ! एरवीं मी विषमुखच ! माझ्या तोंडांतून विषाशिवाय दुसरें काय बाहेर पडणार ? पण आतां मी काय करूं ? ताबडतोब आत्महत्या करूं काय ? कीं यांचें अगोदर सांत्वन करूं ?'

मग त्यानें त्या वृद्धांचें शांतवन करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचें समाधान होणारच कसें ? तिघांचाहि–खरें म्हणजे चौघांचाहि शोक सुरू होता ! कारण जीमूतवाहन आता पुन: दिसणार नाहीं असेंच सर्वांना वाटत होतें. लोकान्तरीं गेलेल्या पुत्रानेंहि आपल्या चरणीं चूडामणि टाकून प्रणाम घातला या विचारानें म्हाताऱ्यांचें हृदय भरून आलें. पुत्र परलोकीं गेला––आपणांस सोडून गेला म्हणून वृद्ध मातेस दु:ख झालें. जीमूतवाहनाच्या पत्नीनें

तो चूडामणि छातीशीं धरून अग्निप्रवेश करण्याची तयारी केली. तिच्या सासूसासऱ्यांनीं पण तेंच करण्याचा बेत केला.

आपणामुळें या सर्वांवर हा दुर्धर प्रसंग ओढवला या विचारानें शंखचूड आपल्या दुःखांत चूर होता. त्यानें राजाला विनंति केली कीं, "आपण या गोष्टीचा पूर्ण तपास करूं. कदाचित् असेंहि शक्य आहे कीं हा नाग नाहीं हें समजून आल्यावर गरुड त्याला सोडून देईल. तेव्हां आपण आतां या रक्ताच्या धारेला अनुसरून मार्ग आक्रमूं या."

सर्वांना ही सूचना ग्राहच वाटली. पण त्यांनीं आत्मदहनासाठीं अग्नि बरोबर घ्यावा असें ठरविलें. पत्नी व सून यांना घेऊन वृद्ध राजा अग्निशाळेंतून अग्नि घेऊन निघाला. शंखचूड गरुडाचा माग काढीत पुढें झाला.

कांहीं पावलें चालल्यावर मलयगिरीच्या शिखरावर त्याला पक्षिराज गरुड दिसला. तो जीमूतवाहनाच्या शरिराचे लचके तोडून खात होता. खातां खातां गरुडाला आश्चर्य वाटूं लागलें. आपलें भक्ष्य क्लेश होत असतांहि इतकें आनंदी असल्याचा हा अनुभव त्याला अगदींच नवीन होता. आपल्यावर मोठे उपकार होत आहेत या भावनेनेंच जीमूतवाहन गरुडाकडे पाहात होता. गरुडानें त्याच्या देहाचे लचके तोडणें एकदम बंद केलें. त्याला तो प्रश्न विचारूं लागला! इतकें कुतूहल त्याच्या मनांत उत्पन्न झालें होतें!

पक्षिराजानें देहभक्षण थांबवल्याबरोबर जीमूतवाहनाचें दुःख सुरू झालें! तो गरुडास म्हणाला, "हे पक्षिराज, एकाएकीं माझ्या देहाचें भक्षण कां थांबविलेंस? तें चालू ठेव. अजूनहि माझ्या देहांत रक्त, मांस बरेंच राहिलें

आहे. तूं तें पूर्णपणें खाऊन टाकल्यानेंच माझ्या जीवनाचें चीज होईल." प्राणान्तक अवस्थेंत देखील हा उदात्त विचार बोलूं शकतो याचा गरुडास फार विस्मय वाटला ! "याच्या हृदयांतून आपण रक्त ओढलें, तर या महात्म्यानें माझें हृदयच आकर्षून घेतलें आहे," असे उद्गार गरुडानें काढले व त्याचें नांव वगैरे गोष्टी विचारल्या. परंतु जीमूतवाहन त्यास म्हणाला, "तूं भुकेला आहेस. माझ्याबद्दलची माहिती ऐकण्याच्या परिस्थितींत तूं नाहींस. तर माझें मांस भक्षून अगोदर आपली तृप्ति करून घे पाहूं."

तेवढ्यांतच गडबडीनें शंखचूड त्या ठिकाणीं येऊन दाखल झाला. तो ओरडून म्हणाला, "पक्षिराज, अविचार करूं नकोस. तो नाग नव्हे. त्याला सोडून दे. सर्पराजानें मला पाठवलें आहे. मी आहें तुझें भक्ष्य. हीं पाहा लाल वस्त्रें." असें बोलून शंखचूडानें आपली छाती त्याच्यापुढें धरली.

शंखचूड अकस्मात् उपस्थित झालेला पाहून आपली इच्छा विफल झाल्यामुळें जीमूतवाहनास मोठा खेद झाला. व दोघांचींहि रक्तवस्त्रें पाहून गरुड गोंधळांत पडला. पण शंखचूडानें त्याला स्पष्ट करून सांगितलें कीं, "महाराज आपण अडचणींत पडण्याचें कांहींच कारण नाहीं. मी नाग आहें हें आपण माझ्या त्वचेवरून, फणावरून व दोन जिभांवरून जाणूं शकत नाहीं का ?"

गरुड :– "मग हा दुसरा कोण ?"

शंखचूड :– "हा विद्याधरांचा तरुण राजा महामना जीमूतवाहन. तुम्ही याच्याशीं निर्दयपणें कां वागलांत ?"

जीमूतवाहनाचें नांव आणि त्याची त्रिभुवनांत झालेली कीर्ति गरुडाला विदित होती. आपण महापाप केलें असें त्याला निश्चित वाटलें. तो फार उद्विग्न झाला. पण जीमूतवाहन त्याला म्हणाला, "गरुत्मन् आपण खिन्न कां? पूर्ण करा ना आपलें महत् कार्य. मला माझें ध्येय गांठण्याच्या कामांत मदत करा."

पक्षिराज गरुड अगदीं थिजला! अत्यंत नीच कृत्य आपल्या हांतून घडलें, आपण प्रत्यक्ष बुद्धाचाच नाश केला असें त्यास वाटूं लागलें व त्याचें प्रायश्चित्त म्हणून अग्निप्रवेश करण्याचा त्यानेंहि निश्चय केला. समोरून अग्नि घेऊन येण्याऱ्या तीन व्यक्ति त्याला दिसतांच त्यांची वाट पाहात तो स्वस्थ राहिला.

शंखचूडानें जीमूतवाहनाला सांगितलें कीं, जवळ येत असणाऱ्या तीन व्यक्ति म्हणजे त्याचे आई, बाप व पत्नी. तेव्हां शंखचूडाला त्यानें विनंति केली कीं, "माझें शरीर नीट आच्छादून टाक. नाहीं तर माझी ही दशा पाहून माझे आईबाप छाती फुटून मरण पावतील." शंखचूडानें त्वरित त्याप्रमाणें केलें.

जीमूतकेतु पुत्राजवळ आला व सर्व कुटुंबाचा त्याग केल्याबद्दल त्याच्यापुढें शोक करूं लागला. गरुड अत्यंत शरमून गेला. त्यानें समुद्रांतील वडवाग्नींत उडी घालण्याचा विचार केला. जीमूतवाहनाच्या नातलगांस तोंड दाखविण्याचें धैर्यहि त्याला बिलकुल राहिलें नाहीं. पण जीमूतवाहनानें त्याला सांगितलें कीं, "हा कांहीं पाप दूर करण्याचा मार्ग नव्हे. मी तुला मार्ग सांगतों. अगोदर आई-

बापांना मला वंदन करूं दे." पण वंदन करावयास उठूं लागतांच जीमूतवाहन मूर्च्छित झाला व त्या वेळीं त्याच्या अंगावरचीं वस्त्रें दूर होतांच त्याचा तो रक्तबंबाळ देह नजरेला पडून जीमूतकेतु, वृद्ध राणी व मलयवती या सर्वांनाच मूर्च्छा आली.

जीमूतवाहन प्रथम शुद्धीवर आला व त्यानें शंखचूडाला पित्याला शुद्धीवर आणण्यास सांगितलें. नंतर सर्व सावध झाल्यावर जीमूतवाहनानें गरुडाला उपाय सुचविला. "हे पक्षिराज, इतःपर कोणत्याहि प्राण्याची तुजकडून हत्या होतां कामा नये. पूर्वींच्या सर्व अपकृत्यांबद्दल तूं पश्चात्ताप व्यक्त केला पाहिजेस. आतां सर्व प्राण्यांना तूं अभय द्यावेंस. आणि सतत पुण्यसंचय करीत राहून पापांचा क्षय करीत यापुढील आयुष्य कंठावेंस."

गरुडानें कृतज्ञतेनें आपलें मस्तक नम्र केलें. अज्ञान व मोह यांतून तो आतां मुक्त झाला. त्या दिवसापासून त्यानें सर्व प्राणिवध बंद केला. नागांचा निर्भय संचार जिकडे तिकडे सुरू झाला. जीमूतवाहनाची कीर्ति मलयगिरीच्या कुंजाकुजां-तून सर्पांगना गाऊं लागल्या. जीमूतवाहनानें गरुडाला आपला निश्चय कायम ठेवावयास सांगितलें. शंखचूडास तो म्हणाला, "बेटा, जा आतां! तुझी आई अस्वस्थ आहे तिला सुखी कर. न मातुः परदैवतम्."

पण शंखचूडाला तेथून जाववेना. सर्पजातीला भयमुक्त करण्याचें ध्येय गांठल्याबरोबर आतां मात्र जीमूतवाहनाला स्वतःच्या शारीरिक वेदनांची जाणीव होऊं लागली. आपलें मरण जवळ आलें असें त्यास वाटूं लागलें. त्याच्या

अंगांत बिलकुल त्राण उरलें नाहीं. आपले हात जुळवावयाला त्यानें शंखचूडाला विनविलें, तेव्हां कुठें त्याला आईबापांना शेवटचें वंदन करतां आलें. "आई, बाबा, हा माझा तुम्हाला शेवटचा प्रणाम ! जातों मी" असें बोलून त्यानें कायमचे डोळे मिटले.

आईबापांचा विलाप अत्यंत करुणाजनक होता. मलयवतीचा आकांत सर्वांच्या हृदयाला घरें पाडूं लागला. वृद्ध राणीनें लोकपालांना प्रार्थना केली कीं, "माझ्या या बाळाला तुम्ही अमृताचें सिंचन करून जिवंत करा."

'अमृत' शब्द कानावर आल्याबरोबर गरुडाला एकदम कल्पना सुचली. आपली सर्व अपकीर्ति आपण अमृताचा उपयोग करून दूर करूं अशी आशा त्यास वाटूं लागली. इंद्राची प्रार्थना करून त्यानें आज्ञापिलेल्या अमृतवृष्टीनें पूर्वीं भक्षिलेले अनंत सर्प आपण उठवूं शकूं अशी त्यास खात्री वाटून तेथून तो गुपचूप निघून गेला.

इकडे शंखचूडाच्या साहाय्यानें जीमूतकेतूनें सर्वांसाठीं चिता रचली. कारण जीमूतवाहनाच्या अभावीं कोणालाहि जगण्याची इच्छा नव्हती. तीं सर्व जणें चितेवर चढण्याच्या तयारींत राहिलीं.

मलयवतीनें आकाशाकडे दृष्टि करून हात जोडले व म्हटलें, " भगवती गौरी, तुझी अशी आज्ञा होती कीं या मलयवतीचा पति विद्याधरांचा सार्वभौम राजा होईल. असें असून तूं माझ्याविषयीं असत्य बोललीस, ही गोष्ट स्पष्ट आहे. माझेंच दैव खोटें ! मी कोणाला बोल लावूं ! "

देवी गौरी प्रकट झाली. तिनें मलयवतीला म्हटलें कीं, " माझी वाणी असत्य कशी ठरेल? सर्व कांहीं ठीक होईल. आपले प्राण वेंचून जगाला मार्ग दाखवणाऱ्या जीमूत-वाहनावर माझी पूर्ण कृपा आहे. "

असें बोलून देवीनें आपल्या कमंडलूंतील पाणी जीमूत-वाहनाच्या मृतदेहावर शिंपडलें. जीमूतवाहन जिवंत झाला. सर्वांना मोठा आनंद वाटला. सर्वांनीं गौरीच्या चरण-कमलांना वंदन केलें.

तितक्यांतच आकाशांतून ढग नसतांहि वृष्टि सुरू झाली. देवीनें राजाला सांगितलें, "पश्चात्तापानें पोळलेल्या गरुडानें ही स्वर्गांतून अमृतवृष्टि करविली आहे. हे पाहा सर्व सर्प जिवंत झाले व सागरांत शिरूं लागले. पर्वतप्राय अस्थिराशी नष्ट झाल्या. वत्सा जीमूतवाहना, तुला केवळ प्राणदान देऊन माझें समाधान होणार नाहीं. या क्षणीं तुला मी विद्या-धरांचा चक्रवर्ती करून सोडत्यें. हे पाहा मतंग आदिकरून सर्व प्रमुख विद्याधर निष्ठेनें तुझ्या सेवेंत तत्पर आहेत."

भगवती गौरीच्या कृपेनें जीमूतवाहन व मलयवती यांना श्रेष्ठ स्थान व सर्व तऱ्हेचें ऐश्वर्य आणि अभ्युदय यांचा लाभ झाला. वृद्ध राजा व राणी सुखी झालीं. शंखचूड व त्याची दुःखी माता यांना जीमूतवाहनानें आधींच भयमुक्त आणि सुखी केलें होतें.

असा होता हा सर्व नागजातीला आनंद देणारा "नागानंद" तथा जीमूतवाहन.

IRBK-0105479